MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
CIN No.U40109MH2005SGC153646

# महापारेषण समाचार

■ वर्ष : १३ अंक : ६ पाने : ८ ■ ऑक्टोबर-नोव्हेंबर २०१९ ■ E-Magazine visit us on : www.mahatransco.in

**प्रिय कर्मचारी बंधू आणि भगिनींनो,**

'महापारेषण समाचार' च्या मागील अंकात आपल्याशी संवाद साधताना मी नवे तंत्रज्ञान, आधुनिकीकरणाची गरज व त्याचे संधीत रूपांतर करताना सांघिक भावनेतून (Team Work) सहभाग देण्याबाबत सांगितले होते. त्याच अनुषंगाने प्रकल्प व संचलनातील सुरू असलेल्या विविध टप्प्यावरील कामाचा नियमित आढावा घेण्याची आवश्यकता व असे प्रकल्प वेळेत कसे पूर्ण होतील, याबाबत काही महत्त्वाच्या बाबींवर आपण बोलुयात.

नवीन कामाचा समग्र विचार केल्यास त्यामध्ये प्रत्यक्षात आपल्या सातही परिमंडळात सुरू असलेल्या उपकेंद्र व त्यासंबंधित वाहिन्यांच्या उभारणीचे काम, जोडवाहिनी, रिॲक्टर व कॅपॅसिटरची उभारणी, इतर

- कामांचा वेळोवेळी आढावा घ्या
- प्रकल्प वेळेत पूर्ण करा
- सांघिक भावना ठेवा
- आधुनिकीकरणावर भर द्या

ORC कामे, नवीन ट्रान्सफॉर्मरची उभारणी, क्षमता वृध्दी किंवा क्षमता बदल करणे, अस्तित्वातील व्दिपद मनोऱ्यावर दुसरी परिपथ वाहिनी उभारणे, गरजेनुसार मनोऱ्याची उंची वाढविणे/स्थलांतरण वा वळविणे किंवा रस्ता व रेल्वे ओलांडून वाहिनी नेणे इत्यादी अनेक कामांचा समावेश होतो. याशिवाय केंद्र व राज्य शासनाच्या विविध प्रकल्पात (नवी मुंबई विमानतळ, सिडको प्रकल्प, रेल्वे प्रकल्प, समृध्दी महामार्ग, मेट्रो प्रकल्प, दिल्ली-मुंबई रेल्वे कॉरिडॉर, औद्योगिक विकास महामंडळ आदी) कामात आपल्या उपकेंद्र व वाहिन्यांच्या उभारणीचा महत्त्वाचा सहभाग आहे.

कोणताही प्रकल्प संकल्पनेपासून पूर्णत्वापर्यंत जाण्यासाठी (Concept to Completion) अनेक टप्प्यातून व प्रक्रियेतून पार होत असतो. महापारेषण हे राज्याच्या पारेषण प्रणालीचे (STU) च्या भूमिकेतून नियोजनासाठी जबाबदार आहे. राज्य उपक्रमाव्दारे अभ्यासाअंती केलेल्या नियोजनातून (STU Plan) प्रकल्पाची सुरूवात होते. त्यास कंपनीच्या संचालक मंडळाची प्रशासकीय मान्यता मिळते व त्यानंतर निविदा प्रक्रियेतून तो प्रकल्प उभारणीचे काम करण्यासाठी योग्य त्या एजन्सीची निवड केली जाते. प्रकल्पाच्या कामावर काटेकोर देखरेख करून त्याची प्रगती ठरलेल्या वेळापत्रकानुसार होत आहे की नाही? नसल्यास, त्यामध्ये काय अडचणी आहेत व त्या दूर करण्यासाठी योग्य समन्वय तसेच एकत्रित प्रयत्नांची (Team Work) गरज असते. प्रकल्पाच्या उभारणीत अडचणी येणे स्वाभाविक आहे. मुख्यतः Right to Way (RoW) च्या वेगवेगळ्या अडचणीतून मार्ग काढणे, नुकसानभरपाईची संमती प्रकरणे व वनविभाग आदींचे ना हरकत/संमती मिळवून चिकाटीने प्रकल्प पूर्णत्वास नेणे हे आपले ध्येय असते.

प्रकल्पाचा नियमित आढावा घेणे किती आवश्यक व महत्त्वाचा आहे हे वरील बाबींवरून लक्षात येईल. प्रकल्पाच्या सद्यस्थितीवर चर्चा करून सर्व संबंधितांनी त्यातील अडचणी कशा सोडवता येतील, याचे विवेचन व विचार तसेच पुढील कार्यवाहीची नेमकी दिशा विविध आढाव्याव्दारे होत असते. असा आढावा संचालक व माझ्याकडून सातत्याने घेतला जात आहे.

महापारेषणच्या प्रकल्पांचा विचार केल्यास सद्यस्थितीला सर्व परिमंडळात मिळून सुमारे दोनशे कामे प्रगतिपथावर आहेत. शंभरावर कामे ORC अंतर्गत चालू आहेत. याशिवाय निविदा प्रक्रियेतील अनेक प्रकल्पांच्या बाबतीत प्रगती आहे. पुढील पाच वर्षाच्या कालावधीतील व राज्य उपक्रम आराखड्यातील समाविष्ट सुमारे दोनशेवर प्रकल्प मंजुरी, निधी तरतूद इ. प्रक्रियेतून जात आहेत. असे एकूण ७०० ते ८०० प्रकल्पांचा आढावा नियमितपणे सांघिक पातळीवर घेतला जातो. तसेच प्रत्येक परिमंडळ व प्रविभागातून तो सातत्याने घेतला जात असेल, याबाबत माझी खात्री आहे.

प्रकल्प पूर्ण झाल्यावर त्याचा कार्य पूर्णत्व अहवाल (WCR) अंतिमतः करणेही महत्त्वाचे आहे. सामुग्रीतील तफावत (Quantity Variation-QV) व वेळेचा विलंब (Time Limit Extension) आदीं पूर्ण करणे आवश्यक आहे. कोणत्याही प्रकल्पामध्ये कामाची किंमत वाढणे किंवा त्याचा अपेक्षित कालावधी वाढणे हे कोणत्याही दृष्टीने योग्य नाही. त्यासाठी सर्वांनी आपापल्या पातळीवर प्रयत्न करणे आवश्यक आहे.

प्रकल्पांचा आढावा घेताना मला जाणवलेल्या काही निरीक्षणांचा या संवादामध्ये समावेश करणे औचित्याचे ठरेल. एजन्सीबरोबर नियमित आढावा बैठक, ROW च्या सोडवणुकीचा योग्य अधिकाऱ्यांकडे समन्वयीन प्रयत्न, सामुग्री, मनुष्यबळ, निधीचा योग्य पाठपुरावा, दूरदृष्टी ठेऊन प्रकल्पपूर्तीच्या अडचणीची माहिती वेळोवेळी घेऊन उच्च अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणणे, या बाबी परिमंडळ पातळीवर अपेक्षित आहेत. तसेच प्रविभाग पातळीवर दर आठवड्यास या बाबींचे सुक्ष्म (Micro-level) नियोजन व गतिमान कार्यान्वयन आवश्यक आहे. प्रकल्पात कामाची प्राथमिकता व वेळेचे नियोजन ठरविणे अत्यंत महत्त्वाचे असते. ही काळजी घेतल्यास आपले प्रकल्प पूर्ण होण्यास मदत होईल.

नवीन संकल्पना व तंत्रज्ञानाचा वापर



**पराग जैन नानोटिया (भा.प्र.से.)**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

प्रकल्पातील अडचणीची सोडवणूक करण्यास नेहमी उपयोगी ठरते. वाहिनीच्या सर्व्हेसाठी ड्रोन तंत्रज्ञानाचा यशस्वी प्रयोग आपण केला आहे. परिणामतः प्रकल्पाच्या साईट एजन्सीला त्वरित हस्तांतरित करणे शक्य झाले आहे. कराड व नाशिक परिमंडळातील 'हरित ऊर्जा प्रकल्पां'तर्गत (Green Energy Corridor) निर्धारित 'लक्ष्या'प्रमाणे पूर्ण होत आहेत. रेल्वे उपकेंद्राची कामे मार्गी लावल्यास नुकसानभरपाईची प्रकरणे मार्गी लावण्यात अशा आढाव्यांची मदत झाली आहे.

औरंगाबाद परिमंडळात ट्रान्सफॉर्मरचे काम नारंगवाडी, गेवराई येथे पूर्ण करण्यात आले. त्याचा प्रणालीस फायदा झाला. सर्वच परिमंडळत वितरणासाठी तातडीने लागणारे ३३ के. व्ही. फिडर-बे चे काम जवळपास पूर्ण झाले आहे. तसेच सर्वच परिमंडळातील दाब नियंत्रणाकरिता (Voltage Profile Improvement) कॅपॅसिटरची स्थापना (फेज १ व २) जवळपास पूर्ण झाली आहे. सातत्याने आढावा घेऊन योग्य प्रयत्नांची सांगड घातल्यानेच असे चांगले परिणाम दिसत आहेत.

सांगायचे तात्पर्य की, प्रकल्प व कामांचा नियमित आढावा आणि त्यांच्या अडचणींकडे वेळेवर लक्ष देऊन संसाधनाचा योग्य समन्वय साधून त्या दिशेने काम करण्यासाठी सांघिक भावनेने सर्वांना प्रोत्साहित करावे, याकरिता मी सर्वांना आवाहन करतो.

**शुभेच्छांसह..!**

**– पराग जैन नानोटिया**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक




**प्रकाशगंगा इमारत, मुंबई :** महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीमध्ये (महापारेषण) दक्षता जनजागृती सप्ताह साजरा करण्यात आला.

■ अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी घेतली शपथ ■

# महापारेषणमध्ये दक्षता जनजागृती सप्ताह साजरा

■ *टीम महापारेषण, मुंबई*

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या महाराष्ट्रातील विविध कार्यालये, उपकेंद्रे व भांडारे यामध्ये दक्षता जनजागृती सप्ताह साजरा करण्यात आला. केंद्रीय दक्षता आयोग आणि राज्य शासनाच्या निर्देशानुसार दि. २८ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर २०१९ या कालावधीत हा सप्ताह आयोजित करण्यात आला होता.

यानिमित्ताने सांघिक कार्यालयामध्ये भ्रष्टाचार निर्मुलनाची प्रतिज्ञा घेण्यात आली. सुरूवातीला कार्यकारी अभियंता (दक्षता) श्रीमती वर्षा शिंदे यांनी उपस्थितांना प्रतिज्ञा दिल्यानंतर मा. राज्यपाल व मा. मुख्यमंत्री यांचा या सप्ताहानिमित्त दिलेला संदेश वाचून दाखविण्यात आला. प्रकाशगंगा इमारतीमध्ये विविध ठिकाणी भित्तीपत्रके, बॅनर्स, पोस्टर्स आणि घोषवाक्ये लावण्यात आली होती.

याप्रसंगी सर्वश्री कार्यकारी संचालक (पारेषण) श्रीकांत राजूरकर, मुख्य अभियंता (राज्य पारेषण उपक्रम) शशांक जेवळीकर, मुख्य अभियंता (अभिकल्प) श्रीराम भोपळे, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) संजय कुमार, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी अनंत पाटील यांच्यासह विविध अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या सप्ताहाचे नियोजन करण्यासाठी मुख्य तपास अधिकारी श्री. श्रीकांत राजूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपमुख्य तपास अधिकारी श्री. बी.एम.पाटील यांचा सक्रिय सहभाग होता.

## इमानदारी-एक जीवनशैली



**नागपूर :** अति उच्च दाब प्रकल्प नि संचलन व सुव्यवस्था परिमंडळ, नागपूर येथे दक्षता जनजागृती सप्ताह साजरा करण्यात आला. याप्रसंगी सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. महेश सावंत, सहाय्यक मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी श्री. पी. बी. परचाके यांच्यासह अन्य अधिकारी व कर्मचारी वर्ग.



## *प्रगतिपथावर असलेली कामे*

लिलो पध्दतीने पंढरपूर-मंगळवेढा वाहिनी



## संविधान आहे महान, सर्वांना हक्क समान



**मुंबई :** महापारेषणच्या सांघिक कार्यालयामध्ये भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करून संविधान दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी वर्ग.

### ■ संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन ■

# महापारेषणमध्ये संविधान दिवस साजरा

■ *टीम महापारेषण, सांघिक कार्यालय*

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीमध्ये (महापारेषण) भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करून संविधान दिवस साजरा करण्यात आला.

सुरुवातीला महापारेषणचे संचालक (प्रकल्प) श्री. रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले. यावेळी संचालक (संचलन) सर्वश्री संजय ताकसांडे, कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) सुगत गमरे, कार्यकारी संचालक (पारेषण) श्रीकांत राजूरकर, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) संजय कुमार, महाव्यवस्थापक (मा.सं.मनुष्यबळ नियोजन) सुधीर वानखेडे, महाव्यवस्थापक (मा.सं.आस्थापना) राजू गायकवाड, मुख्य अभियंता श्रीराम भोपळे, मुख्य विधी सल्लागार शिवाजीराव पाटील, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) मंगेश शिंदे, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी भरत पाटील, शिष्टाचार अधिकारी सतिश जाधव यांच्यासह विविध अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संधीची समानता, संविधानाची महानता



**औरंगाबाद :** संविधान दिनानिमित्त आयोजिलेल्या कार्यक्रमात जमलेले अधिकारी व कर्मचारी वर्ग.




**औरंगाबाद :** परिमंडळामध्ये संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. चंद्रशेखर बोराडे यांनी उपस्थितांना संविधानाची माहिती देणारे पॉवरपॉईंट प्रेझेंटेशन केले.

### ■ संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन ■

# औरंगाबाद परिमंडळामध्ये संविधान दिवस साजरा

■ *टीम महापारेषण, औरंगाबाद*

औरंगाबाद परिमंडळामध्ये संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रारंभी वरिष्ठ व्यवस्थापक (मा.सं.) श्रीमती मंजूषा दुसाने यांनी प्रास्ताविक केले. मुख्य अभियंता (प्रभारी) श्री. महेंद्र वाळके यांनी संविधान उद्देशिकेचे वाचन करून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताचे संविधान तयार करण्यासाठी घेतलेल्या परिश्रमांची उपस्थितांना माहिती सांगितली. तसेच संविधानामध्ये नागरिकांना असलेले मुलभूत अधिकार व कर्तव्याबाबत सविस्तर माहिती विषद केली.

याप्रसंगी सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. चंद्रशेखर बोराडे यांनी संविधानाची माहिती देणारे पॉवरपॉईंट प्रेझेंटेशन करून संविधान तयार करण्यासाठी नेमलेल्या समिती सदस्यांच्या नेमणुकीपासून संविधानामध्ये असलेल्या विविध तरतुदींबाबत सखोल मार्गदर्शन केले. यावेळी मुख्य अभियंता (प्रभारी) सर्वश्री महेंद्र वाळके, अधीक्षक अभियंता (स्थापत्य) संदीप हाके, अधीक्षक अभियंता (प्रभारी) रंगनाथ शेळके, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) चंद्रशेखर बोराडे, महाव्यवस्थापक (विवले) प्रवीण यशवंते यांच्यासह अनेक अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

प्रयत्नांची पराकाष्ठा

■ महापुरामुळे मनोरा क्रमांक २७ झुकला ■

# २२० के. व्ही. मिरज-तिळवणी वाहिनी पूर्ववत

■ टीम महापारेषण, सांगली

महापुरामुळे २२० के. व्ही. मिरज-तिळवणी येथील मनोरा क्रमांक २७ पूर्णपणे झुकला होता. मात्र, सर्व फौंडेशन व लेग सुस्थितीत होते. दरम्यान, महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तातडीने घटनास्थळाला भेट देऊन झुकलेला मनोरा सुरक्षितपणे हटविण्याचे काम केले. तसेच नवीन मनोरा बसविण्याचे काम तात्काळ पूर्ण केले. त्यामुळे २२० के. व्ही. मिरज-तिळवणी वाहिनी पूर्ववत सुरू केली.

मनोरा क्रमांक २७ अर्धवट झुकलेला असल्याने व त्यावर कंडक्टरमुळे सदर मनोरा हटविणे हे धोकादायक होते. क्रेन किंवा इतर मशिनरी सदर मनोऱ्यापर्यंत पोहोचणे अशक्य होते. दरम्यान, कठीण परिस्थितीमध्येही मनोरा हटविण्यासाठी इमारत बांधकाम साहित्याचा वापर करण्याचे ठरले. त्यानुसार इमारत बांधकाम साहित्याच्या उपयोगाने झुकलेल्या मनोऱ्याला आधार देऊन तो सुरळीतपणे हटविला. त्यानंतर नवीन मनोरा उभारणीचे काम हाती घेण्यात आले. पण, कृष्णा नदीच्या पाणीपातळीमध्ये वाढ होऊ लागल्याने वारंवार मनोरा उभारणीचे काम थांबवावे लागत होते. मात्र, प्रतिकूल नैसर्गिक परिस्थितीतून मार्ग काढत कर्मचाऱ्यांनी मनोरा उभारला.

यासाठी अउदा संवसु मंडळ कोल्हापूरचे अधीक्षक अभियंता श्री. अरविंद डडमल, कार्यकारी अभियंता श्री. अभिजित धमाले, अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. जगन्नाथ माळी यांचे मार्गदर्शन लाभले. मनोरा उभारणीमध्ये अउदा वाहिनी देखभाल उपविभाग इचलकरंजीचे उपकार्यकारी अभियंता सर्वश्री शितल कांबळे, प्रमुख कार्यदेशक सतीश कोळी, नेताजी वडर, विजय जाधव, महादेव रावळ, संजय कांबळे, प्रितम कावडे, असिफ घुणके, भागवत कांदे या कर्मचाऱ्यांची मोलाची भूमिका होती.



सांगली : महापुरामुळे २२० के. व्ही. मिरज-तिळवणीचा हाच तो झुकलेला मनोरा क्रमांक २७.

तातडीने नवीन मनोरा उभारणीचे काम

Team Work

■ परिसरातील वीजपुरवठा सुरळीतपणे होणार ■

# १३२ के. व्ही. भोकर-तामसा एकदल वाहिनीचे काम पूर्ण

■ टीम महापारेषण, नांदेड

तामसा उपकेंद्रामध्ये (जि.नांदेड) १३२ के.व्ही. भोकर–तामसा एकदल वाहिनीचे काम युध्दपातळीवर पूर्ण करून वाहिनी व 'बे' कार्यान्वित करण्यात आला.

नांदेड जिल्ह्यातील विजेचा तुटवडा आणि दिवसेंदिवस मागणीत होणारी सततची वाढ लक्षात घेता १३२ के.व्ही. वाघाला-तामसा एकदल वाहिनी लांबी ४९ कि.मी. ची सद्यस्थितीमध्ये १३२ के.व्ही. तामसा उपकेंद्रास वीजपुरवठा करीत होती. दुसरी वैकल्पिक वाहिनी १३२ के.व्ही. तामसा उपकेंद्रास नसल्यामुळे सदरील वाहिनीवर विजेचा अतिरिक्त भार येत होता. त्यासाठी पर्यायी वाहिनी आवश्यक होती.

दरम्यान, १३२ भोकर–तामसा एकदल वाहिनी कार्यान्वित झाल्यामुळे विजेच्या मागणीनुसार पारेषणप्रणाली सक्षम झाली आहे. त्यामुळे ५० MW हे २२० के.व्ही. भोकर उपकेंद्रातून पुरविला जात आहे. उपकेंद्रामुळे किनवट (जि.नांदेड), हिमायतनगर (जि. नांदेड) या टोकाच्या तालुक्यातील पाच ते सहा के.व्ही. व्होल्टेजमध्ये वाढ झाली आहे. वाहिनी व 'बे' काम पूर्ण करण्यासाठी मुख्य अभियंता (प्रभारी) सर्वश्री महेंद्र वाळके, अधीक्षक अभियंता अनिल भारसाखळे, कार्यकारी अभियंता (प्रभारी) संजय लोंढे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता संजय नलबलवार, अतिरिक्त कार्यकारी अभियंता संजय महाले, सहायक अभियंता रविप्रकाश मिश्रा, अभय चंद, प्रशांत नाईकवाडे, जयश्री उपासे, रिजवाना पठाण, नयन शेळके, अश्पाक अहमद, माधव सोनकांबळे यांनी परिश्रम घेतले.



नांदेड : तामसा उपकेंद्रामध्ये १३२ भोकर–तामसा एकदल वाहिनीचे काम युध्दपातळीवर पूर्ण करून वाहिनी व 'बे' कार्यान्वित करण्यात आला. याप्रसंगी अधिकारी व कर्मचारी वर्ग.



## प्रगतिपथावर असलेली कामे

पिंपळगाव-एकलहरे दुहेरी परिपथ वाहिनी



■ आंतरपरिमंडळीय क्रीडा स्पर्धेत महिलांचा लक्षणीय सहभाग ■

# अउदा संवसु मंडळाला सर्वसाधारण विजेतेपद

■ *टीम महापारेषण, औरंगाबाद*

औरंगाबाद परिमंडळांतर्गत २०१९-२०२० या वर्षाकरिता घेण्यात आलेल्या आंतरपरिमंडळीय क्रीडा स्पर्धेत अति उच्च दाब संचलन व सुव्यवस्था मंडळाने सर्वसाधारण विजेतेपद पटकाविले. उपविजेतेपद अति उच्च दाब संचलन व सुव्यवस्था मंडळ, परळीने पटाकाविले.

प्रारंभी आंतरमंडळीय स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा क्रीडा अधिकारी श्री. अशोक गिरी यांच्या हस्ते झाले. यावेळी मुख्य अभियंता (प्रभारी) श्री. महेंद्र वाळके उपस्थित होते. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी अधीक्षक अभियंता (स्थापत्य) श्री. संदीप हाके, अधीक्षक अभियंता श्री. रंगनाथ चव्हाण, अधीक्षक अभियंता (प्रभारी) श्री. रंगनाथ शेळके, सहाय्यक महाव्यवस्थापक (प्रभारी) श्री. चंद्रशेखर बोराडे यांच्यासह सर्व कार्यकारी अभियंते व त्यांच्या चमूने परिश्रम घेतले. या स्पर्धेचे आयोजन अति उच्च दाब स्थापत्य बांधकाम नि संवसु मंडळ व अउदा प्रकल्प मंडळ, औरंगाबाद यांनी केले. या स्पर्धेत परिमंडळातील चार मंडळांतर्गत अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विशेषतः महिला खेळाडूंचा सहभाग लक्षणीय होता.



**औरंगाबाद :** येथील आंतरपरिमंडळीय क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन करताना जिल्हा क्रीडा अधिकारी सर्वश्री अशोक गिरी, शेजारी मुख्य अभियंता (प्रभारी) महेंद्र वाळके, संदीप हाके, रंगनाथ चव्हाण, श्री. रंगनाथ शेळके व अन्य.



**औरंगाबाद :** सर्वसाधारण विजेतेपद पटकाविल्यानंतर जल्लोष करताना अति उच्च दाब संचलन व सुव्यवस्था मंडळाचे खेळाडू.

■ आंतरमंडळीय क्रीडास्पर्धा उत्साहात ■

# अउदा संवसु मंडळ, अमरावतीला सर्वसाधारण विजेतेपद

■ *टीम महापारेषण, अमरावती*

अमरावती परिमंडळांतर्गत आयोजिलेल्या आंतरमंडळीय क्रीडास्पर्धेत सर्वसाधारण विजेतेपद अति उच्च दाब संचलन व सुव्यवस्था मंडळ, अमरावतीने तर उपविजेतेपद अति उच्च दाब संचलन व सुव्यवस्था मंडळ, अकोला यांनी पटकाविले.

स्पर्धेचे उद्घाटन मुख्य अभियंता श्री. रोहिदास मस्के यांच्या हस्ते करण्यात आले. तीन दिवस चाललेल्या या क्रीडास्पर्धेत अउदा संवसु मंडळ अमरावती येथे कार्यरत असलेले श्री. रोहन चव्हाण यांनी उत्कृष्ट खेळाडू म्हणून सन्मानित करण्यात आले.

पारितोषिक वितरण कार्यक्रम मुख्य अभियंता श्री. रोहिदास मस्के यांच्या हस्ते पार पडला. यावेळी अधीक्षक अभियंता, अउदा संवसु मंडळ, अकोला सर्वश्री सुधीर ढवळे, अधीक्षक अभियंता, अउदा संवसु मंडळ, अमरावती अविनाश शिंदे, अधीक्षक अभियंता, स्थापत्य मंडळ, अमरावती गोविंद जाधव, अधीक्षक अभियंता (प्रभारी) चाचणी व संचरण मंडळ, अकोला प्रवीण देशमुख, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) नितीन कांबळे उपस्थित होते. स्पर्धा यशस्वी पार पाडण्यासाठी सर्वश्री नरेंद्र गणोरकर, राजेंद्र पाटील, युनुस शेख, सचिन फाले, धीरज मेंढुले, श्रीकांत टेहरे, अमित सयाम यांनी परिश्रम घेतले.




**अमरावती :** परिमंडळांतर्गत आयोजिलेल्या आंतरमंडळीय क्रीडास्पर्धेत सर्वसाधारण विजेतेपद अउदा संवसु मंडळ, अमरावतीने तर उपविजेतेपद अउदा संवसु मंडळ, अकोला यांनी पटकाविले.

New Technology

■ अउदा संवसु विभाग, रत्नागिरीतील श्री. जितेंद्र पाथरे यांचा प्रयोग ■

# महापारेषणच्या अभियंत्याने केले नवे सॉफ्टवेअर विकसित

■ टीम महापारेषण, रत्नागिरी

महापारेषणच्या अति उच्च दाब संचलन व सुव्यवस्था विभागाच्या रत्नागिरी विभागातील अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. जितेंद्र पाथरे यांनी नवे सॉफ्टवेअर विकसित केले आहे. त्यांच्याकडे उपलब्ध असणाऱ्या संसाधनाव्दारे त्यांनी हे सॉफ्टवेअर तयार केले आहे.

ज्याव्दारे MFM व MAB सीरीजच्या ABT मीटरचे घड्याळ शिफ्ट झाले असल्यास पूर्ववत करता येऊ शकते. याकरिता ४०० रूपये किंमतीचा कन्व्हर्टर (USB to RS485) विकत घ्यावा लागतो. आपल्या संगणकावर किंवा लॅपटॉपव्दारे मीटरचे घड्याळ हे थेट बदलता येते. एकदा खरेदी केलेला कन्व्हर्टर हा कायमस्वरूपी कितीही वेळा व कितीही मीटरसाठी वापरता येतो.

भविष्यात सुरू होणाऱ्या पॉवर ट्रेडिंगसाठी सध्या महापारेषणमध्ये युध्दपातळीवर AMR प्रकल्प सुरू आहे. महापारेषणमधून दुसऱ्या कंपनीला बाहेर जाणाऱ्या अथवा दुसऱ्या कंपनीमधून महापारेषण कंपनीला मिळणारा ऊर्जेचा लेखाजोखा व त्याव्दारे बिलींग १५/५ मिनिटांच्या ब्लॉकमध्ये करावयाचे आहे. याची चाचणी सध्या इंटरफेस पॉईंट ABT मीटरपासून सुरू होणार आहे. यासाठी सर्व मीटरचे RTC (रिअल टाईम क्लॉक/घड्याळ) सुरळीत अथवा वेळेवर असणे गरजेचे आहे. या सॉफ्टवेअरचा महापारेषण कंपनीमध्ये वापर करण्याच्या सूचना सांघिक कार्यालयाकडून देण्यात आल्या आहेत. श्री. पाथरे यांनी आपल्या कौशल्याने सॉफ्टवेअर विकसित केल्याबद्दल महापारेषण कंपनीमध्ये त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

■ प्रात्यक्षिक अभ्यासक्रमावर भर दिला जाणार ■

# वाळूज येथे डी.सी. लिकेज टेस्टिंग लॅब

■ टीम महापारेषण, औरंगाबाद

प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र वाळूज येथे क्षेत्रीय अभियंत्याच्या मदतीने डी.सी. लिकेज टेस्टिंग लॅब सुरू करण्यात आली.

या लॅबमध्ये प्रत्यक्ष उपकेंद्र बॅटरी, बॅटरी चार्जेर आणि कंट्रोल पॅनल याची प्रत्यक्षात उभारणी करून उपकेंद्रसदृश्य परिस्थिती निर्माण करण्यात आली. बॅटरी चार्जेरचे बूस्ट व फ्लोट मोड कसे हाताळावे, बॅटरी चार्ज-डिस्चार्ज कसे करावे, डी.सी. लिकेज असल्यास त्याचे आधुनिक उपकरण पध्दतीने कसे हाताळावे याचे प्रात्यक्षिक देणे सहज शक्य आहे.

औरंगाबाद परिमंडळाचे मुख्य अभियंता (प्रभारी) श्री. महेंद्र वाळके यांच्या मार्गदर्शनाखाली २२० के. व्ही. उपकेंद्र, चितेगावचे उपकार्यकारी अभियंता श्री. गणेश सोनवणे यांनी लॅबचे काम केले. यासाठी सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. चंद्रशेखर बोराडे, प्रादेशिक प्रशिक्षण केंद्राचे केंद्रप्रमुख श्री. रंगनाथ शेळके, सहकेंद्रप्रमुख श्री. बाबासाहेब पोटे, समन्वयक डॉ. नितीन झोपे याचे सहकार्य लाभले.



## महापारेषण कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची निवृत्ती माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर २०१९

### निवृत्ती

| अ.क्र. | नाव (सर्वश्री) | पद | पदस्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | किशोर महादेव जाधव | अधीक्षक अभियंता | अउदा संवसु मंडळ, नाशिक | ३१.१०.२०१९ |
| २. | रवींद्र हिरामण सातपुते | अधीक्षक अभियंता | सांघिक कार्यालय, मुंबई | ३०.११.२०१९ |

■ प्रशिक्षणार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग ■

# अकोला येथे अभियंत्यांसाठी प्रशिक्षण शिबिर

■ *टीम महापारेषण, प्रशिक्षण*

अमरावती परिमंडळांतर्गत ज्ञानप्रकाश प्रशिक्षण केंद्र अकोला येथे विविध विषयांवर प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले. नागपूर, औरंगाबाद, पुणे, वाशी, नाशिक, कराड व अमरावती येथील उपकार्यकारी व सहाय्यक अभियंत्यांना 'EHV Sub Station Design' या विषयावर प्रशिक्षण देण्यात आले.

तांत्रिक कर्मचाऱ्यांसाठी कामाच्या ठिकाणी पाळावयाच्या सुरक्षिततेबाबत दोन दिवसीय, 'EHV वाहिनी देखभाल' या विषयावर चार दिवसीय व 'Refresher Training' या विषयावर सहा दिवसीय प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले. तसेच तांत्रिक, लेखा व वित्त विभागातील पुरूष कर्मचाऱ्यांसाठी 'द लिंक ' या प्रशिक्षण संस्थेमार्फत 'सर्वोत्तम' व ISIL' या प्रशिक्षण संस्थेमार्फत 'लक्ष्य' हे प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले. अभियंता कर्मचाऱ्यांना महापारेषणमधील वित्तीय विषयावर 'Finance for Non Finance' या अंतर्गत प्रशिक्षण देण्यात आले. तसेच उपकेंद्र प्रमुखांकारिता 'GO Live Plan of Load Analysis Application' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. प्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी केंद्रप्रमुख सर्वश्री प्रवीण देशमुख, गजानन कोल्हे, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) नितीन कांबळे यांनी परिश्रम घेतले. प्रशिक्षण केंद्राच्या समन्वयक श्रीमती चारुलता काळे यांनी यशस्वीरित्या व्यवस्थापन केले.




**अकोला :** अमरावती परिमंडळांतर्गत ज्ञानप्रकाश प्रशिक्षण केंद्र, अकोला येथे विविध विषयांवर प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले. याप्रसंगी वरिष्ठ अधिकारी व अभियंते.



**तळंदगे :** कराड परिमंडळातील तळंदगे केंद्रात विविध विषयांवर प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले. याप्रसंगी वरिष्ठ अधिकारी व प्रशिक्षणार्थी.

■ प्रशिक्षणार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद ■

# तळंदगे येथे विविध विषयांवर प्रशिक्षण

■ *टीम महापारेषण, कराड*

कराड परिमंडळातील तळंदगे केंद्रात विविध विषयांवर प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले. त्याला प्रशिक्षणार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

यामध्ये वर्ग ३ व ४ कर्मचाऱ्यांसाठी `लक्ष्य` व `सर्वोत्तम` हे Behaviroural प्रशिक्षण, Non-Finance officer's यांचेसाठी `Finance to Non-Finance` प्रशिक्षण, वर्ग ३ व ४ कर्मचाऱ्यांसाठी `Refresher Training on S/stn (O&M)` प्रशिक्षण घेण्यात आले. तसेच उपकेंद्रामध्ये कार्यरत AEE, DY.EE & AE (Trans) यांचेसाठी `EHV S/stn Design, Construction,Testing & Safety` चे प्रशिक्षण देण्यात आले.

AEE, DY.EE & AE (Trans) यांचेसाठी `EHV S/stn Design, Construction,Testing & Safety` या प्रशिक्षणासाठी सातही परिमंडळातील अभियंते उपस्थित होते. या प्रशिक्षणांतर्गत उपकेंद्राच्या उभारणीची पध्दत, चाचणी करण्याची पध्दत, सुरक्षा व त्यांची साधने या विषयांची सखोल माहिती देण्यात आली. तसेच Fire-Extinguisher चे प्रात्यक्षिक यशस्वीरित्या घेण्यात आले. प्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी मुख्य अभियंता श्रीमती शिल्पा कुंभार, सर्वश्री अधीक्षक अभियंता (स्थापत्य) सुनील माने व सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) इमाम सिद्दिकी, प्रशिक्षण केंद्र समन्वयक नितीन डाके यांनी परिश्रम घेतले.



**पडघे :** सांघिक कार्यालय प्रशिक्षण विभागाच्या वतीने आयोजिलेल्या चार दिवसीय प्रशिक्षण शिबिराच्या समारोपप्रसंगी वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी वर्ग.

■ सांघिक कार्यालयाच्या प्रशिक्षण विभागाचा पुढाकार ■

# पडघे येथे चार दिवसीय प्रशिक्षण शिबिर


■ *टीम महापारेषण, प्रशिक्षण*

सांघिक कार्यालय प्रशिक्षण विभागाच्या वतीने 'HV Substation Design, Layout, Testing & Quality Assurance including IS, Rules, Regulations, Project Management' या विषयांवरील चार दिवसीय प्रशिक्षण शिबिर पडघे येथील प्रादेशिक प्रशिक्षण केंद्रात घेण्यात आले. यामध्ये कंपनीच्या सर्व परिमंडळात कार्यरत असलेल्या अभियंत्यांनी आपला सहभाग नोंदविला.

वेतनगट श्रेणी-३ व ४ मधील कर्मचाऱ्यांची व्यावहारिक गुणवत्तेत वाढ करण्याच्या दृष्टिकोनातून 'सर्वोत्तम' ही दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आली. 'The Link' या संस्थेतील प्रशिक्षक श्री. सुहास घोलप आणि श्रीमती धनलक्ष्मी पटवर्धन यांनी हे प्रशिक्षण दिले. तसेच 'लक्ष्य' ही तीन दिवसीय कार्यशाळाही घेण्यात आली. 'लक्ष्य' ही कार्यशाळा Indian School of Integrated Learning या संस्थेतील श्रीमती भाग्यश्री घोसाळकर आणि श्रीमती सोनाली थिटे यांनी घेतली. यावेळी 'सर्वोत्तम' आणि 'लक्ष्य' या दोन्हीही कार्यशाळेतील प्रशिक्षणार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. विविध प्रशिक्षण हे सांघिक कार्यालय येथील प्रशिक्षण विभाग यांचे नियोजन तसेच प्रशिक्षण केंद्राचे प्रमुख अधीक्षक अभियंता, उदादिधा ग्रंके संवसु मंडळ, पडघा आणि सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं), वाशी परिमंडळ यांच्या मार्गदर्शनात पार पडले.

From the Desk of ED, HR

# आरोग्यम् धनसंपदा




आयुष्य हीच खरी दौलत असते. आयुष्य चांगले जगण्याकरिता चांगले आरोग्य असणे गरजेचे असते. त्याकरिता आपले आरोग्य जपण्याची जबाबदारी आपली आहे. एकदा एका विचारवंताने आपल्या भाषणात म्हटले की, माणूस प्रथम संपत्ती मिळविण्यासाठी आरोग्य खर्ची घालतो. नंतर आरोग्य मिळविण्यासाठी पैसा खर्ची घालतो. खरोखरच किती मार्मिक सत्य या विचारवंताने सांगितले आहे. Health is wealth पण कधीकाळी हे Wealth देखील Health ची साथ सोडून देते.

एका इंग्लिश विचारवंताने आपल्या आरोग्यविषयक विचारात म्हटले आहे की, ''The Happiness of your life depend upon the quality of your health but quality of your health depend upon your healthy life style.'' बदलत्या जीवनशैलीमुळे आज आरोग्याच्या अनेक समस्या उभ्या राहत आहेत. म्हणूनच व्यायामाला आपल्या दैनंदिन आयुष्याचा भाग बनवायला हवा. रोजच्या रोज व्यायाम केल्यामुळे शरीरात एक वेगळाच उत्साह निर्माण होतो.

सध्याचे जीवन हे धकाधकीचे झालेले आहे. यात जो वेळेचे गणित योग्यरितीने सोडवितो तोच पुढे जातो. पण, यात हल्ली माणूस आपल्या आरोग्याकडे काहीसा दुर्लक्ष करू लागला आहे. आरोग्याकडे दुर्लक्ष करणे म्हणजेच आजाराला निमंत्रण देण्यासारखे आहे. सध्या यांत्रिकी उपकरणामुळे शारीरिक कष्ट कमी होत चालले असल्यामुळे अनेक समस्या उदभवत आहेत. त्यातून अनेक रोगांना निमंत्रण मिळत आहे. विज्ञानाने भौतिक सुख माणसाला दिले. पण, त्यामुळे काही अंशी शारीरिक आणि मानसिक स्वास्थ हरविले आहे.

आपला आहार हा संतुलित व सात्विक असला पाहिजे. सात्विक आहार असेल तर आपले विचारही सात्विक राहण्यास मदत होते. दररोज काही ठराविक वेळेत योग्य व्यायाम केला पाहिजे. व्यायामामुळे शरीरातील स्नायू बळकट होतात. रक्ताभिसरण चांगले होते. शरीर बळकट झाल्यामुळे प्रतिकारशक्ती वाढते. आपोआपच रोगजंतूशी पांढऱ्या पेशी लढू शकतात. उत्साह वाढतो व कोणतेही काम आपण सहजपणे करू शकतो. शुध्द शरीरात शुध्द मन वास करते. ठराविक वेळ काम केल्यानंतर पुरेशी विश्रांती आवश्यक असते. पुरेशी विश्रांत न मिळाल्यास आरोग्यावर त्याचा परिणाम होतो. कोणतेही काम कुशलतेने व नीटनेटके करायचे असेल तर नियोजनबध्द पध्दतीने केले पाहिजे.

आपण आपल्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी म्हणजेच स्वत:साठी थोडासा वेळ काढला पाहिजे. आपण सर्वांनी संकल्प करूयात तो फक्त संकल्प न ठेवता प्रत्यक्षात अंमलात आणुया. आरोग्य हे धन आहे आणि प्रत्येकाने शारीरिक व मानसिक स्वास्थ चांगले राखण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

घरी गेल्यावर घरच्यांबरोबर हास्यविनोद करा. मनाचं आरोग्य बिघडलं तर शरीराचं बिघडतं. त्याचे परिणाम कधी लवकर दिसतात तर कधी उशिरापण दिसतात, हे नक्की. आयुष्यातील आव्हानं सहज पेलण्याकरिता, मानसिक आरोग्य उत्तम राखण्याकरिता वेळ काढून मन प्रसन्न राहण्याकरिता छंद जोपासा. नातेवाईक, मित्र-मैत्रिणींशी संवाद ठेवा.

व्यक्तीची उत्पादकता (Productivity) उंचवत ठेवण्यासाठी चांगला आरोग्याची खूप मदत होते. चांगला आहार-विहार व व्यायाम हे निरोगी आरोग्याचे गमक आहे. माणसाने शारीरिक, मानसिक, भावनात्मक व आर्थिक या चार घटकांवर मजबूत असणे गरजेचे आहे. त्याकरिता जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत.

चांगल्या आरोग्यामुळे जीवनात आव्हानांना पेलवणारी क्षमता वाढते. 'सर सलामत तो पगडी पचास.' तसेच 'लाथ मारू तिथे पाणी काढू' या वाक्यातून असा अर्थबोध होतो की, जर माणूस खंबीर असेल तर तो काहीही शक्य करू शकतो. अगदी प्रतिकूल परिस्थितीतूनसुध्दा तो यशप्राप्ती करू शकतो.

तख्त, तलवार व तिजोरी जर यशाचे मापदंड असतील तर तेही मिळविण्याकरिता चांगले आरोग्य असणे गरजेचे आहे. चांगल्या आरोग्यामुळे आपण जीवनाचा आनंद घेऊ शकतो. तसेच चांगला आनंद दुसऱ्यांना देण्यात आपण मदत करू शकतो. आपले शरीर व मन धर्मस्थळासारखे असते. शरीर म्हणजे मंदिर व मन म्हणजे त्यामधील मूर्ती. ज्याप्रमाणे आपण आपली धर्मस्थळं स्वच्छ व सुंदर ठेवतो, त्याप्रमाणे आपल्या शरीराला व मनाला स्वच्छ, सुंदर ठेवता आले पाहिजे.

प्रत्येकांनी आपल्या आरोग्याची योग्य ती काळजी घेऊन शारीरिक व मानसिकदृष्ट्या बदल घडवून जीवनातील कितीही मोठ्या आव्हानांना सामोरे जाणे शक्य आहे. त्याकरिता आपण जाणीवपूर्वक प्रयत्न कराल.

**शुभेच्छांसह..!**

**- सुगत गमरे**

**कार्यकारी संचालक (मानव संसाधन) (प्रभारी)**

संपादक : डॉ. मिलिंद आवताडे, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं.सी.-१९, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by **PRO** for **Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,**
Printed at **Hema Arts:** 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka, W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai-400 068. Ph : 2896 8221
& Published at Prakashganga, Bandra-Kurla Complex, Mumbai-400 051.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.